


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा

● वर्ष १ ● अंक १२८ ● शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAHMAR/ 26 /A3072 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Web.http://epaper.citynewssuperfast.com




## »थोडक्यात

### आता पुन्हा २० राज्यांमध्ये राबवणार मतदार नोंदणी अभियान!

**नवी दिल्ली :** देशात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनानंतर मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे हटवण्यात आली होती. त्यामुळे या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. आता अशा २० राज्यात मतदार नोंदणी विशेष अभियान राबवले जाणार आहे, जिथे एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे वगळण्यात आलेली नावे पुन्हा यादीत जोडता येणार आहेत. माहितीनुसार, निवडणूक आयोगाने २९ सप्टेंबर रोजी लिखित निर्देश जारी केलेत.

---

### प्रदीप पुर्णेकर प्रकरण : शूटर्सना अटक!

**ठाणे :** ठाण्यातील मानपाडा परिसरातील ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना मंगळवारी २९ सप्टेंबर रोजी घडली होती. तब्बल पाच जणांनी त्यांच्या कार्यालयात घुसून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या आणि ते जिवंत असल्याचं पाहून आरोपींनी त्यांच्यावर कोयत्याने वार केले होते. यानंतर हे आरोपी पळून गेले होते. यापैकी आणखी दोन आरोपींना अटक करण्यात ठाणे गुन्हे शाखेला यश आले आहे.

---

### रोहित पवारांचा रात्रीपासून एस.एम. जोशी पुलावर ठिय्या!

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक परीक्षेतील पेपरफुटीमुळे राज्यभरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार आणि सचिव महेंद्र हरपाळकर यांनी तातडीने राजीनामा द्यावा, या मुख्य मागणीसाठी पुण्यातील एस. एम. जोशी पुलावर विद्यार्थ्यांनी गुरुवारी सायंकाळपासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.

**CLASSIFIED**

**पाहिजेत**

Myntra कंपनी करिता डिलिव्हरी बॉय पाहिजेत
- साई नगर रूट
- तपवन रूट
- गोपल नगर

**आमचा पत्ता**

मोती बाग जवड मोती नगर
अमरावती 444606
संपर्क 8626048727

# दुर्गादेवीची मूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनाला अपघात; सात जण ठार

## समृद्धी महामार्गावरील धामणगाव जवळील घटना

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अमरावती :** शेगाववरून दुर्गादेवीची मूर्ती घेऊन वर्धा जात असताना धामणगाव जवळ चॅनल ९७ येथे झालेल्या अपघातात वर्धा येथील पाच जण जागीच ठार तर २१ जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरूवारी रात्री एक वाजता दरम्यान घडली. जखमींना तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. तर रुग्णालयात उपचारादरम्यान आणखी दोघांचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या ७ वर पोहोचली आहे. वर्धा येथील हे भाविक शेगाव येथून दुर्गादेवी घेऊन बोलोरो पिकअप क्रमांक एम एच ०५ बी एच ५७९३ ने मागच्या बाजूला ट्रॉली लावून वर्धा येथे धीम्या गतीने जात होते.





दरम्यान याच वेळी सोळा चक्के ट्रॅक क्रमांक सीजी ०७ सीझेड ८८५५ ने मागून धडक दिली. या भीषण अपघातात पाच जण जागीच ठार झाले गंभीर जखमींना सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात आले. यातील पाच जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. या भीषण अपघाताची माहिती मिळताच नगराध्यक्ष अर्चना अडसड रोठे यांनी ग्रामीण रुग्णालय येथे तातडीने धाव घेतली जखमी असलेल्या रुग्णांना वाहनाची उपलब्धता करत सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात मदत केली. दरम्यान विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. महेश पाटील, पोलीस अधीक्षक अनिकेत कदम, चांदूर रेल्वेचे पोलीस उपविभागीय अधिकारी गिरीश ताथोड यांनी रात्री घटनास्थळावर भेट दिली. दत्तापूरचे पोलीस निरीक्षक गजानन मेहत्रे, मंगरूळ दस्तगीरचे पोलीस निरीक्षक आत्राम यांनी घटनास्थळावर धाव घेतली.

### अशी आहेत मृतकांची नावे

मृतकामध्ये दत्ता कुरसंगे (५५), प्रवीण बकाने (५०), घनश्याम पाटील (६०), गोलू उर्फ सचिन बादलमवार (३८), ओम गावंडे (२२) यांचा समावेश आहे. हे सर्वजण सोमनाथ लेआउट सिंधी मेघे येथील रहिवासी होते. तसेच २१ जणांचा जखमींमध्ये समावेश आहे.

### अपघातात २१ जण जखमी

जखमी झाले असून त्यात दिनेश रामकृष्ण पोहणकर (३५), नरेंद्र प्रल्हाद संयाम (४९), मुनेश्वर देवराव ढोले (५३), सागर मुनेश्वर ढोले (२७), रोशन राऊत (२६), सतीश वसंत राऊत (४३), सतीश पांडुरंग खाडे (३५), अनिल मारोतराव मसराम (४७), दिनेश पांडुरंग नानवटे (४०), नयन सुधीर खानजोडे (२९), यश रवी मलकापुरे (३०) आणि अमित अनिल आडे (२५) यांचा समावेश आहे. तसेच प्रतिक रामदास शिरसकर (३१), अनुज अनिल आडे (२३), दुर्गेश यशवंत भिसेन (३०), आर्यन प्रभाकर वैद्य (१९), शुभम शामसुंदर ढबाले (३०) व प्रणय प्रभाकर ढोले (३३) हे किरकोळ जखमी झाले आहेत.

# दिल्लीत एसआयआरचा विरोध, आप नेता ताब्यात!

## सीजेपी मुंबईत करणार आंदोलन

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**मुंबई :** दिल्लीतील डावे पक्ष, आप आणि विद्यार्थी संघटनांनी एसआयआर प्रक्रियेविरोधात शुक्रवारी आंदोलनाची हाक दिली आहे. आप नेते सौरभ भारद्वाज जंतर मंतरवर पोहोचताच त्यांना ताब्यात घेण्यात आले.

आयसा (ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन), आरजेडी खासदार मनोज झा आणि ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी जनतेला जंतर मंतरवरील आंदोलनात सामील होण्याचे आवाहन केले आहे. जंतर मंतरवर पोलीस आणि आरएएफचे जवान तैनात करण्यात आले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून, जवळच्या ११ मेट्रो स्थानकांचे प्रवेश आणि बाहेर पडण्याचे दरवाजे पुढील सूचना मिळेपर्यंत बंद करण्यात आले आहेत. यामध्ये जनपथ, पटेल चौक, सेंट्रल सेक्रेटरीएट, राजीव चौक, सेवा तीर्थ, मंडी हाऊस आणि लोक कल्याण मार्ग मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. दिल्ली पोलीस आयुक्त जंतर मंतरवर पोहोचले आणि त्यांनी सुरक्षेचा आढावा घेतला. दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस



ठाण्याबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात होणाऱ्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. दरम्यान, कॉकरोच जनता पार्टी आज दुपारी ४ वाजल्यापासून मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणार आहे.

### खासदार मनोज झा यांनीही जंतरमंतर गाठून आंदोलन केले

आरजेडी खासदार मनोज झा जंतर मंतरवर म्हणाले, 'आंदोलन करण्यासाठी परवानगीची गरज असते का? अखेर, हा गांधींचा देश आहे. आज गांधी जयंती आहे. मला हे सांगायचे आहे की, देशाला पोलीस राज्य बनवूनही पंतप्रधान ज्ञानेश कुमार आणि गृहमंत्री आपली दुष्कृत्ये लपवू शकणार नाहीत.'

# सहलीला गेलेल्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू!

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**आळंदी :** सहलीचा आनंद लुटण्यासाठी हसतमुखाने घराबाहेर पडलेली आठ मुले पुन्हा कधीच परतणार नाहीत, ही कल्पनाच आळंदीकरांच्या काळजाचा ठोका चुकवणारी ठरली आहे. रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेत आळंदीतील 'विनर्स ॲकेडमी'च्या आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. गुरुवारी सायंकाळी घडलेल्या या दुर्घटनेमुळे आळंदी आणि लगतच्या केळगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, सहलीतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आळंदीतील 'विनर्स अकॅडमी'मधील इयत्ता अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेच्या सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांना घेऊन शिक्षक गुरुवारी पहाटे रायगड किल्ला आणि दिवेआगर येथे सहलीसाठी रवाना झाले होते. दिवसभर पर्यटन केल्यानंतर दुपारी विद्यार्थी दिवेआगर समुद्रकिनारी पोहोचले. यावेळी समुद्राच्या पाण्यात उतरलेल्या काही विद्यार्थ्यांना लाटांचा आणि पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात ओढले गेले. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. आठही विद्यार्थ्यांना पाण्याबाहेर काढण्यात आले; मात्र त्यांचे प्राण वाचू शकले नाहीत. या दुर्घटनेत यश किरण वानखेडे, सोहम तुकाराम भांडवलकर, तन्मय दत्तात्रय वहिले, कौस्तुभ संदीप दौड, कैवल्य वासनकर, राजवीर वहिले, प्रणव बनसोडे आणि सुमित अहिरे या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. हे सर्व विद्यार्थी आळंदी आणि केळगाव परिसरातील रहिवासी होते. या दुर्घटनेनंतर सहलीचे नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

# महाविद्यालयाचे संलग्नीकरण नसताना प्रवेश कसे?

## श्रीमती पंचफुलादेवी पाटील महाविद्यालयातील प्रकार

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला :** खडकी येथील श्रीमती पंचफुलादेवी पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (कॉलेज कोड २६४) यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे संलग्नीकरण मिळाले नसल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. मात्र, असे असतानाही महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले असल्याची बाब समोर




आल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. संलग्नीकरण नसताना विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची परवानगी नेमकी कोणी दिली? याविषयी संस्थेशी संपर्क केला असता त्यानी प्रतिसाद दिला नाही.

### विद्यापीठाच्या यादीत नाव का नाही?

एका बाजूला विद्यापीठाकडून संलग्नीकरण नसलेल्या महाविद्यालयांची माहिती प्रसिद्ध करण्यात आली, तर दुसऱ्या बाजूला कॉलेज कोड 264 असलेल्या श्रीमती पंचफुलादेवी पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे नाव त्या यादीत नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या नोंदी आणि प्रत्यक्ष महाविद्यालयाची स्थिती यामध्ये नेमका ताळमेळ काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. महाविद्यालयाला २०२६-२७ साठी संलग्नीकरण मिळालेले नसल्यास ही माहिती प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांना स्पष्ट करण्यात आली होती का? विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या मान्यतेबाबत नेमकी कोणती माहिती देण्यात आली? याची चौकशी होणे आवश्यक आहे.

### प्रवेश घेतले, आता परीक्षा कशी देणार?

सर्वात गंभीर बाब म्हणजे, विद्यापीठाच्या अधिकृत माहितीनुसार संबंधित महाविद्यालयाला २०२६-२७ साठी संलग्नीकरण नसल्याने तेथील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेला बसता येणार नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.विद्यार्थी आणि पालकांनी महाविद्यालयावर विश्वास ठेवून प्रवेश घेतला असेल आणि आता विद्यापीठाकडून परीक्षा देता येणार नसल्याची माहिती समोर येत असेल, तर या विद्यार्थ्यांची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

### विद्यापीठाने तातडीने चौकशी करावी

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून कॉलेज कोड 264 असलेल्या श्रीमती पंचफुलादेवी पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या २०२६-२७ मधील प्रवेशांची पडताळणी करावी. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांना देण्यात आलेली कागदपत्रे, शुल्क पावत्या, प्रवेश नोंदी आणि विद्यापीठाशी झालेला पत्रव्यवहार तपासावा.तसेच, महाविद्यालयाला संलग्नीकरण का देण्यात आले नाही, संलग्नीकरण नसलेल्या महाविद्यालयांच्या यादीत या महाविद्यालयाचे नाव का नव्हते आणि आता विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेला बसता येणार नसल्यास त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे काय, याबाबत विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी. संलग्नीकरण नाही, तरी प्रवेश झाले; आता परीक्षा नाही तर विद्यार्थ्यांचे काय? या एका प्रश्नाने ग्रासले आहे.

### विद्यार्थ्यांच्या डोळ्यात धूळफेक झाली का?

संलग्नीकरणाची स्थिती स्पष्ट नसताना विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास, विद्यार्थ्यांची दिशाभूल झाली का, याची गंभीरपणे तपासणी करावी लागणार आहे. प्रवेशाच्या वेळी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संलग्नीकरणाबाबत काय माहिती दिली, याचे पुरावे तपासणे आवश्यक आहे.विद्यापीठाचे संलग्नीकरणच नसताना प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यात आले असेल, तर हा प्रकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा ठरू शकतो, अशी चर्चा आता सुरू झाली आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे.

# वाहन फिटनेस घोटाळा; 300 आरटीओंना नोटिसा!

## ७३५ अधिकारी-निरीक्षक तपासणीच्या कक्षेत

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**मुंबई :** राज्यातील परिवहन वाहनांना योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस) देताना नियमांचे उल्लंघन झाल्याचे चौकशीत समोर आले आहे. या प्रकरणी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, डेप्युटी आरटीओ, एआरटीओ आणि मोटार वाहन निरीक्षकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. उपलब्ध माहितीनुसार सुमारे ३०० अधिकाऱ्यांना नोटिसा देण्यात आल्या असून, ७३५ अधिकारी व निरीक्षक चौकशीच्या कक्षेत असल्याचे समोर आले आहे.

नमुना ३८ आणि ३८ ए जारी करताना अनियमितता होत असल्याच्या तक्रारीनंतर शासनाच्या निर्देशाने चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने १ सप्टेंबर २०२४ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत



### खुलाशानंतर पुढील कारवाई

नोटिसा बजावण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये मोटार वाहन निरीक्षकांसह सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. संबंधित अधिकाऱ्यांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करून पुढील कारवाई निश्चित केली जाणार आहे. काही अधिकाऱ्यांवर निलंबन, तर काहींविरोधात विभागीय चौकशी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यातील परिवहन कार्यालये आणि खासगी अधिकृत चाचणी केंद्रांमार्फत (एटीएस) जारी करण्यात आलेल्या नमुना ३८ आणि ३८ ए प्रमाणपत्रांची तपासणी केली. चौकशी अहवाल ३ जून २०२६ रोजी प्रशासन विभागाला सादर केला.

### पाच प्रकारच्या अनियमितता

नमुना ३८ ए जारी झाल्यानंतर १४ दिवसांत मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याने नमुना ३८ देणे बंधनकारक असताना विलंबाने प्रमाणपत्र दिलेली वाहने. इतर राज्यातून नमुना ३८ ए जारी झाल्यानंतर महाराष्ट्रातील मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याने नमुना ३८ न देता अन्य परिवहन कार्यालयातून प्रमाणपत्र दिलेली वाहने. राष्ट्रीय परवाना असलेल्या मालवाहू वाहनांमध्ये व्हीएलटीडी नसतानाही नमुना ३८ दिलेली वाहने. १ जानेवारी २०१९ नंतर उत्पादित काही प्रवासी वाहनांमध्ये व्हीएलटीडी नसतानाही नमुना वाहने. परिवहन वाहनांमध्ये स्पीड लिमिटिंग डिव्हाइस (एसएलडी) नसतानाही नमुना ३८ दिलेली वाहने.

### शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर

अधिकाऱ्यांकडून कर्तव्यात कसूर झाल्याचे आणि केंद्रीय मोटार वाहन नियमांसह केंद्र, राज्य शासन व परिवहन आयुक्त कार्यालयाच्या निर्देशांचे पालन न केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याचे नोटिशीत नमूद आहे. शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर का करू नये, याबाबत तातडीने उत्तर देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मुलांना रस्त्यावर उतरावे लागणे हे सरकारचे अपयश : सुप्रिया सुळे

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**पुणे :** २ ऑक्टोबर हा महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री या भारताच्या थोर सुपुत्रांच्या विचारांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. मात्र, अशा पवित्र दिवशी राज्यात आणि देशात सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि तरुण मोठ्या प्रमाणावर आंदोलने करत रस्त्यावर उतरत आहेत. लोकशाही धोक्यात असल्याचे हे अत्यंत चिंताजनक संकेत आहेत. आज आपल्या मुलांनी शाळा, महाविद्यालये किंवा नोकरीवर असणे अपेक्षित असताना त्यांना परीक्षा आणि हक्कासाठी रस्त्यावर आंदोलने करावी लागत आहेत. हे अतिशय दुर्दैवी असून सरकारने यावर गांभीर्याने आत्मचिंतन करण्याची गरज आहे, असा परखड हल्लाबोल राष्ट्रवादी कॉंग्रेस



शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.

पुण्यात पत्रकारांशी संवाद साधताना खासदार सुप्रिया सुळे यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन, राज्यातील भीषण दुष्काळ, रोहित पवारांवर सत्ताधाऱ्यांकडून झालेले आरोप, पत्रकारांवरील हल्ले आणि पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवर सविस्तर भूमिका मांडली. पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर बोलताना त्या म्हणाल्या, 'एमपीएससीच्या अध्यक्षांचा राजीनामा घेण्यात यावा आणि परीक्षा पद्धतीतील गोंधळ दूर व्हावा, या प्रमुख मागणीसाठी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. मुलांच्या नेमक्या काय भावना आणि अडचणी आहेत, हे थेट समजून घेण्यासाठी मी स्वत: सकाळी ११ वाजता आंदोलनस्थळी जाऊन त्यांची भेट घेणार आहे. विद्यार्थ्यांच्या या भावना सरकार दरबारी तातडीने मांडल्या पाहिजेत.' ज्याप्रमाणे केंद्रात महत्त्वाच्या आणि राष्ट्रीय विषयांवर ऑल पार्टी मीटिंग बोलावली जाते, तसाच गंभीर विचार राज्य सरकारने दुष्काळाच्या बाबतीत केला पाहिजे. यासाठी राज्य शासनाने विधानसभेचे किमान तीन दिवसांचे विशेष चर्चासत्र अथवा अधिवेशन बोलवावे. सर्व आमदारांचा आणि लोकप्रतिनिधींचा फीडबॅक घेऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, कारण ग्रामीण भागातील परिस्थिती अतिशय बिकट आहे.

## गांधीवादी जीवनशैली आणि विचार

गांधी मार्ग (गांधीवादी जीवनशैली आणि विचार) हा सत्य, अहिंसा आणि साधेपणावर आधारित आयुष्य जगण्याचा एक मार्ग आहे. महात्मा गांधींनी दाखवलेला हा मार्ग केवळ राजकारण किंवा स्वातंत्र्यलढ्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो समाजसुधारणा आणि आत्म-विकास (स्वयं-विकास) घडवून आणण्याचे एक प्रभावी माध्यम आहे.

गांधी मार्गाचे प्रमुख स्तंभ- सत्य (Truth): गांधीजींच्या मते 'सत्य हाच ईश्वर आहे'. आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिकपणा आणि निष्ठा जपणे हा या मार्गाचा पहिला नियम आहे.- अहिंसा (Non-violence): अहिंसा म्हणजे केवळ कोणालाही शारीरिक दुखापत न करणे एवढाच नाही, तर वाणी आणि विचारांनीही कोणाचे वाईट न चिंतणे होय.

सत्याग्रह (Satyagraha): अन्यायापुढे न झुकणे आणि अहिंसक मार्गाने विरोध दर्शवणे. साधेपणा आणि अपरिग्रह: गरजेपेक्षा जास्त वस्तूंचा साठा न करणे आणि साधी राहणी, उच्च विचार ही जीवनशैली स्वीकारणे.

# सत्य अन् अहिंसेच्या विचारांनी जगाला नवी दिशा देणारे महापुरुष

आजचे आधुनिक जग प्रगतीच्या शिखरावर पोहोचलेले असले, तरी दुर्दैवाने युद्धाचे सावट, द्वेष, आणि वाढत्या हिंसाचारामुळे मानवी शांतता धोक्यात आली आहे. अशा तणावपूर्ण जागतिक वातावरणात महात्मा गांधींचे 'सत्य आणि अहिंसा' हे विचार जगभरातील मानवासाठी मार्गदर्शक दीपस्तंभासारखे कार्य करत आहेत. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जगात 'जागतिक अहिंसा दिन' साजरा केला जातो. शांतता, प्रेम, परस्पर आदर आणि सहिष्णुतेच्या विचारांनी जगाला एकत्र बांधणे आणि हिंसेचा त्याग करून संवादाचा मार्ग स्वीकारणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवी मूल्यांची जपणूक करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. गांधीजींनी केवळ भारताच्या स्वातंत्र्यलढ्यालाच नव्हे, तर संपूर्ण जगातील मानवाधिकार चळवळींना एक नवी दिशा दिली. त्यांनी आयुष्यभर दाखवून दिले की, सर्वात कठीण संघर्षांवर मात करण्यासाठी हिंसेचा मार्ग स्वीकारण्याची अजिबात गरज नसते. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध लढताना अहिंसेच्या मार्गाने मिळवलेला विजय हा चिरस्थायी आणि

## आज महात्मा गांधी यांची जयंती

नैतिकदृष्ट्या सर्वात मजबूत असतो.

जागतिक स्तरावर अहिंसेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र महासभेने १५ जून २००७ रोजी एक विशेष ठराव संमत केला. या ठरावाद्वारे २ ऑक्टोबर हा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्मदिवस 'जागतिक अहिंसा दिन' म्हणून घोषित करण्यात आला. या निर्णयामुळे गांधीजींच्या अहिंसावादी तत्त्वज्ञानाला जागतिक पातळीवर सर्वोच्च सन्मान मिळाला. जगभरातील १९० हून अधिक देशांनी या ठरावाला पाठिंबा दिला होता, ज्यावरून गांधीजींच्या विचारांची सार्वकालिक आणि वैश्विक उपयुक्तता स्पष्ट होते. गांधीजींची शिकवण ही केवळ भूतकाळातील इतिहासापुरती मर्यादित नसून ती आजच्या आधुनिक समस्यांवर मात करण्यासाठी तितकीच प्रभावी आहे. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर, नेल्सन मंडेला आणि दलाई लामा यांसारख्या जागतिक नेत्यांनी गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वांचा अवलंब करून आपापल्या देशांत मोठे सामाजिक आणि राजकीय बदल घडवून आणले.



२ ऑक्टोबर रोजी 'जागतिक अहिंसा दिना'च्या निमित्ताने भारतभर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध सामाजिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये अहिंसेच्या मूल्यांवर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद आणि चित्रकला प्रदर्शने भरवली जातात. विविध सामाजिक संस्था आणि तरुण अहिंसेचा संदेश घराघरांत पोहोचवण्यासाठी शांतता मार्च आणि प्रभातफेऱ्या काढतात. याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर परिसंवाद आणि विचारमंथन कार्यशाळा आयोजित केल्या जातात. या चर्चासत्रांमध्ये जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी, युद्धजन्य परिस्थिती टाळण्यासाठी आणि सामाजिक सलोखा वाढवण्यासाठी अहिंसेचा स्वीकार कसा करावा, यावर सखोल चर्चा केली जाते. द्वेष आणि हिंसाचारामुळे फक्त विनाश, मनुष्यहानी आणि असंतोष निर्माण होतो, तर अहिंसा, मैत्री आणि संवादामुळेच मानवी समाजाचा खरा विकास आणि समृद्धी शक्य आहे, हा संदेश या उपक्रमांमधून दिला जातो.

जागतिक अहिंसा दिन हा आपल्याला आपल्या सांस्कृतिक आणि नैतिक वारशाचा अभिमान बाळगण्यास प्रेरित करतो. हा दिवस केवळ एक औपचारिक सोहळा नसून, हिंसाचारमुक्त आणि शांततापूर्ण भविष्याच्या दिशेने प्रत्येक मानवाने टाकलेले एक संकल्पबद्ध पाऊल आहे.

### महात्मा गांधींविषयी...

महात्मा गांधी यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांना आदराने बापू आणि राष्ट्रपिता म्हटले जाते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव पुतलीबाई तर वडिलांचे नाव करमचंद गांधी असे होते. त्यांच्या पत्नीचे नाव कस्तुरबा गांधी होते. त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सन्मान व पदव्या मिळाल्या. महात्मा गांधी यांना 'महात्मा' ही पदवी रवींद्रनाथ टागोर यांनी दिली) तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'राष्ट्रपिता' म्हणून संबोधले. त्यांचा मृत्यू ३० जानेवारी १९४८, नवी दिल्ली (नाथूराम गोडसे यांच्याकडून हत्या).

**दक्षिण आफ्रिका कार्य :** त्यांनी दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाविरुद्ध सत्याग्रहाचा लढा दिला आणि ९ जानेवारी १९१५ रोजी ते भारतात परतले.

**चंपारण्य व खेडा सत्याग्रह (१९१८) :** शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा दिला.

**असहकार चळवळ (१९२२):** ब्रिटीश राजवटीविरोधात असहकाराचे हत्यार उपसले.

**दांडी यात्रा / मिठाचा सत्याग्रह (१९३०) :** मिठाचा कायदा मोडण्यासाठी ४०० किलोमीटरची ऐतिहासिक पदयात्रा काढली.

**भारत छोडो आंदोलन (१९४२) :** ब्रिटीशांना भारत सोडण्यासाठी तीव्र आंदोलन छेडले.

### दैनंदिन जीवनात अहिंसेचे महत्त्व आणि भवितव्य

अहिंसा म्हणजे केवळ शस्त्र न उचलणे किंवा शारीरिक हिंसा न करणे एवढाच सीमित अर्थ नाही. विचारांमधील अहिंसा, भाषेतील नम्रता आणि वर्तनातील सहिष्णुता ही देखील अहिंसेचीच रूपे आहेत. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियावरील द्वेषयुक्त भाषण आणि मानसिक तणाव रोखण्यासाठी गांधीजींच्या तत्त्वांची नितांत गरज आहे. जर आपण आपल्या दैनंदिन वर्तनात सहिष्णुता, संयम आणि संवादाला स्थान दिले, तर कुटुंबात, समाजात आणि पर्यायाने संपूर्ण जगात चिरस्थायी शांतता प्रस्थापित होऊ शकते.

# अहंकाराचे विसर्जन अन् साधेपणाचा धडा: महात्मा गांधींच्या जीवनशैलीतून काय शिकावे?

आज २ ऑक्टोबर—राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती. भारत देशाला पारतंत्र्याच्या शृंखलेतून मुक्त करण्यासाठी, देश घडवण्यासाठी आणि प्रत्येक नागरिकाला स्वावलंबी बनवण्यासाठी गांधीजींनी आयुष्यभर लढा दिला. स्वदेशी चळवळ आणि अहिंसेच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्याला हादरा दिला. दांडी यात्रेसारख्या ऐतिहासिक आंदोलनाने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा दिली. परंतु, महात्मा गांधी केवळ एक राजकीय नेते नव्हते; तर ते आचार आणि विचारांची सांगड घालणारे एक थोर व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील एक लहान पण अत्यंत अर्थपूर्ण प्रसंग आजच्या काळात अधिक विचार करायला लावणारा आहे. ब्रिटिश सरकारने मीठावर जुलमी कर लादल्यानंतर गांधीजींनी दांडी यात्रेचे आयोजन केले होते. यात्रेच्या पूर्वसंध्येला आणि प्रवासादरम्यान हजारो नागरिक, सत्याग्रही गांधीजींसोबत जोडले जात होते. आश्रमात किंवा मुक्कामाच्या ठिकाणी एवढ्या मोठ्या जनसमुदायासाठी सुविधा तोकड्या पडणे स्वाभाविक होते. तिथे कुणी थंड तर कुणी गरम पाण्याने कसेबसे आंघोळ उरकून यात्रेसाठी तयार होत होते. अशा वेळी, संपूर्ण देशाचे नेतृत्व करणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वतःसाठी कोणत्याही विशेष सुविधेची अपेक्षा केली नाही. त्यांनी कुठलाही संकोच किंवा मोठेपणाचा अहंकार न बाळगता, स्वतः उठून पाणी गरम केले, पाण्याची बादली उचलली आणि एका सामान्य सत्याग्रहीप्रमाणे आंघोळ उरकून आंदोलनाच्या तयारीला लागले. सहभागी यात्रेतील एका नागरिकांने त्यांना प्रश्न विचारला की आपण एवढ्या मोठ्या पदावर आहात आपल्या जवळपास संख्या नोकर वर्ग आहे, त्यांना तुम्ही पाणी टाकून मागू शकले असते व तुम्ही त्यांना बोलू सुद्धा शकले असते, या प्रश्नावर महात्मा गांधींनी त्यांना प्रतिउत्तर देत सांगितले की मला माहित आहे की मी नौकरांना बोललो तर नक्कीच ते माझे ऐकतील परंतु कोणत्या गोष्टीसाठी बोलावे आणि कोणत्या नाही ही समज आपल्यामध्ये असायला हवी. नौकर वर्ग व कर्मचारी वर्ग यांना आपण बोलून दमदाटी करून काम करून घेतले तर त्यांना आपली व आपल्या कामाची जबाबदारी समजणार नाही, आपली जबाबदारी स्वतः कळायला हवी यासाठी आपण आपलं स्वतःचं काम केल्यास नक्कीच नोकर वर्ग किंवा कर्मचाऱ्यांना आपली जबाबदारी कळेल आणि ते पुढे जबाबदारीने स्वतः कामाला लागतील, अशी प्रतिक्रिया राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी त्यांना दिली. आपण कितीही मोठ्या पदावर असलो तरी सुद्धा आपण आपली नीतिमत्ता सोडायला नको.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
**मो. 9822674487**

# ज्ञानेश्वरीचे परिष्करण : मूळ संहितेच्या शोधाचा प्रवास

आज सकाळी आळंदीहून आलेल्या एका संदेशाने लक्ष वेधून घेतले—'ज्ञानेश्वरी परिष्करण दिन!' अर्थातच हा दिवस श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या ज्ञानेश्वरी जयंतीचा, तसेच सप्तमी श्राद्धाचा स्मरणदिन म्हणूनही महत्त्वाचा आहे. मात्र 'परिष्करण' या शब्दामागे केवळ शुद्धीकरण नसून, एका महान ग्रंथाच्या मूळ संहितेचा शोध घेण्याचा प्रदीर्घ आणि शास्त्रीय प्रवास दडलेला आहे.

आज संत ज्ञानेश्वरांनी सिद्ध केलेली मूळ ज्ञानेश्वरी आपल्याकडे उपलब्ध नाही. संत एकनाथ महाराजांनी जनार्दन स्वामींच्या कृपेने ज्ञानेश्वरीची विस्कटलेली संहिता ओळखून तिचे 'प्रतिशुद्धीकरण' केले. मात्र तो छपाईपूर्वीचा काळ असल्याने त्यानंतरच्या हस्तलिखित प्रतींमधून पुन्हा पाठभेद निर्माण होत गेले.

यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे हस्तलिखितांची नक्कल. सुमारे नऊ हजार ओव्यांचा हा ग्रंथ नकलताना अक्षरांची, शब्दांची किंवा ओव्यांची गळ होणे, व्याकरणात्मक चुका होणे, एखादा शब्द वाचता न आल्यास नकलाकाराने आपल्या आकलनानुसार शब्द घालणे, असे प्रकार घडत गेले. त्यामुळे हस्तदोष, अनवधान आणि कधी बुद्धिदोष यांमुळे ज्ञानेश्वरीच्या संहितेत अनेक पाठभेद निर्माण झाले. म्हणूनच आज उपलब्ध असलेल्या विविध 'सार्थ ज्ञानेश्वरी' एकमेकींच्या शब्दशः समान नाहीत; त्यामागे वापरलेल्या हस्तलिखित संहितांचा आधार वेगवेगळा आहे.



साहित्याच्या क्षेत्रात मूळ संहिता निश्चित करण्यासाठी विशिष्ट शास्त्रीय निकष आहेत. दुर्मिळ आणि प्राचीन हस्तलिखितांचा चिकित्सक अभ्यास करून प्राचार्य रामदास डांगे यांनी या दिशेने महत्त्वाचे संशोधनकार्य केले. त्यामुळे 'परिष्करण' म्हणजे एखादा ग्रंथ बदलणे नव्हे; उलट उपलब्ध पुराव्यांच्या आधारे त्याच्या मूळ स्वरूपाच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा प्रयत्न होय.

या दिनाचे महत्त्व आणखी वाढते ते उद्याच्या *'मराठी अभिजात भाषा गौरव दिना'*मुळे. ज्ञानेश्वर माऊलींनी अत्यंत तरुण वयात ज्ञानेश्वरी सिद्ध केली. मग हा ग्रंथ केवळ निवृत्तीनंतर वाचायचा, अशी समजूत आपण का करून घ्यावी? नव्या पिढीला योग्य वयात ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या, त्यातील जीवनदृष्टी, विचारशक्ती, कर्तव्यबुद्धी आणि आत्मपरीक्षणाची शिकवण दिली, तर भारतीय ज्ञानपरंपरेचा वर्तमानाशी सर्जनशील संवाद घडू शकतो. 'ज्ञानेश्वरीचे परिष्करण' ही केवळ संहितेची शुद्धी नाही; ती आपल्या ज्ञानपरंपरेच्या स्मृतीचेही परिष्करण आहे.

**प्रा. डॉ. सुहास उगले**
(लेखक ज्ञानेश्वरीचे अभ्यासक आहेत.)

# दुष्काळावर मात : हवी सर्वांची साथ

महाराष्ट्रात पावसाचा खंड आणि पिकांचे नुकसान पाहून राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर - १ नुसार दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहिर करुन त्या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी १२ उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकरी - नागरिकांना सहाय्य करुन दुष्काळावर मात करायची आहे यासाठी सर्वांची भक्कम साथ अत्यंत महत्त्वाची आहे.महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हा प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहे. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंद्याच्या खरीप हंगामा पासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे. पावसाचे प्रमाण, पावसातील तूट आणि पाऊस पडण्यातील मोठा खंड यावर आधारित ट्रिगर - 1 म्हणजे प्रथम कळ लागू करण्यात आली आहे. दुष्काळ जाहिर करण्याच्या प्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे.

**शेतकऱ्यांना कोणत्या सवलती***

ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजना लागू करता येतात. मात्र, या सवलती आपोआप सर्वांना मिळतात असे नाही. संबंधित विभागांकडून शासन निर्णयानुसार त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यानुसार दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहिर झालेल्या भागात खालीलप्रमाणे 12 उपाययोजना राबविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

**(1) जमीन महसुलात सवलत :** दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्याची तरतूद आहे. **(2) पीक कर्जाचे पुनर्गठन :** शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते. **(3) कर्जवसुलीस स्थगिती :** शेती कर्जाच्या वसुलीला ठरावीक कालावधीसाठी स्थगिती देता येते. **(4) वीजबिलात सवलत :** दुष्काळग्रस्त भागातील कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलतीच्या उपाययोजना करता येतात. **(5) परीक्षा शुल्कमाफी :** दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत किंवा माफी देण्याची तरतूद आहे. **(6) टँकरने पाणीपुरवठा :** पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करता येतो. **(7) चारा उपलब्धता :** पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करता येतात. **(8) रोजगाराच्या कामांना चालना :** दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत गरजेनुसार कामे सुरू करता येतात. **(9) पिण्याच्या पाण्याला प्राधान्य :** उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची व्यवस्था केली जाते. **(10) पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती :** पाणीपुरवठा योजनांच्या तातडीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाऊ शकते. **(11) वीजपुरवठा खंडित न करण्याच्या उपाययोजना :** दुष्काळग्रस्त भागातील पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाय करता येतात. **(12) पीक नुकसानीसाठी स्वतंत्र मदत :** पीक नुकसानभरपाई ही ट्रिगर-१ लागू झाल्याने थेट मिळत नाही. त्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाने निश्चित केलेले मदतीचे स्वतंत्र निकष लागू राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी मदत देण्याची स्वतंत्र प्रक्रिया मदत व पुनर्वसन विभागाने नमूद केली आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील 265 तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील 358 पैकी 265 तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ 75 टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील 75 टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

***ट्रिगर - 1 म्हणजे काय?***

महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ट्रिगर-1 हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे का, हे तपासण्यासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तीन टप्प्यांच्या मूल्यमापनातील हा पहिला टप्पा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जून 2018 मधील सुधारित शासननिर्णयानुसार, मान्सून कालावधीत 75 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेल्या भागात दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली धोक्याची सूचना म्हणून ट्रिगर-1 लागू केला जातो. ट्रिगर-1 लागू झाला म्हणजे थेट पूर्ण दुष्काळ घोषित होत नाही. यानंतर प्रशासकीय पातळीवर दुष्काळ निवारणाची प्रक्रिया सुरू होते.ट्रिगर-1 च्या अहवालानंतर राज्य शासन प्रभावित तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी, चारा छावण्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याचा मार्ग मोकळा करते. शासकीय नियमांनुसार, ट्रिगर-1 ची अंमलबजावणी झाल्यानंतर पुढील टप्प्यात उपग्रह निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचे मूल्यांकन करून ट्रिगर-2 चा आढावा घेतला जातो. त्यानंतर निवडक गावांमध्ये प्रत्यक्ष पीक पंचनामे करून शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान आढळल्यास ती गावे अधिकृतपणे दुष्काळ घोषित करण्यास पात्र ठरतात.

राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक भागांमध्ये पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेतला जात आहे. पाहणी दौरा केला जात आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून त्रिस्तरीय समिती पंचनामे करणार आहे. या समितीमध्ये तलाठी,कृषी सहायक व ग्रामसेवक यांचा समावेश असून ते गाव पातळीवर पंचनामे करणार असल्याची माहिती आहे.

***मुख्यमंत्री व शासन बांधावर***

महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या अडचणींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर, धाराशिव,सोलापूर, वाशिम जिल्ह्यांचा दौरा केला. शेतांमध्ये जाऊन त्यांनी पिकांची पाहणी केली, शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव, मोताळा, अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील गावांना भेटी देऊन पाहणी केली आणि बळीराजाला धीर दिला.तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत संवेदनशीलता व्यक्त करीत बाधित भागांतील परिस्थिती जाणून घेण्यावर भर दिला आहे. राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ प्रशासकीय अहवाल आणि आकडेवारी पुरेशी नसते. शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकणे आणि स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्यात पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. विशेषतः धाराशिव व वाशिम जिल्ह्यातील पाहणीदरम्यान शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेतल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांइतकाच महत्त्वाचा प्रश्न आहे तो पिण्याच्या पाण्याचा. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी या दौऱ्यादरम्यान स्पष्ट केले. त्याचबरोबर जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यासोबतच शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांसाठी अन्नधान्याची व्यवस्था केली जाणार आहे. दुष्काळाची झळ केवळ शेतीला बसत नाही, तर त्याचा परिणाम कुटुंबाच्या रोजच्या गरजांवरही होतो. त्यामुळे पाणी, चारा आणि अन्नधान्य या मूलभूत गरजांचा एकत्रित विचार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. मदत जाहीर झाल्यानंतर ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने शेतकऱ्यांना थेट मदत त्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल आणि शासन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

**अनिल आलुरकर,**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.



### 265 तालुके दुष्काळाच्या छायेत

पश्चिम विदर्भ म्हणजे अमरावती विभागात 5 जिल्हे येतात. त्यानूसार सर्व 56 तालुके दुष्काळाच्या छायेत आले आहेत त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, सिंदखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा व नांदुरा; अमरावती जिल्ह्यातील अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, चांदूरबाजार व दर्यापूर; अकोला जिल्ह्यातील अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर व बार्शीटाकळी; वाशिम जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा व मानोरा; तसेच यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी व राळेगाव या तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व 56 तालुक्यांना प्रथम कळ (ट्रिगर -1) लागू करण्यात आला आहे. याप्रमाणे राज्यातील 265 तालुके समाविष्ट आहेत. दुष्काळी परिस्थितीत राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आमच्या मदतीच्या केंद्रस्थानी आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत. आम्ही शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या आव्हानावर मात करण्यासाठी आपण सर्व एकजूटीने प्रयत्न करूया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या तालुक्यांतील शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी बारा उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

'पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले आहेत. सर्व्हेक्षण करताना पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑर्डिनेटद्वारे पिक परिस्थितीचा अहवाल सादर केला जाणार आहे. राज्याचे कृषि आयुक्त यांनी खरीप 2026च्या हंगामाचा आढावा घेऊन राज्यातील 265 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचा अहवाल सादर केला. त्यामुळे आता या राज्यातील तालुक्यामध्ये जून ते आज पर्यंत या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या 265 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीबाबत दुष्काळाबाबतच्या Trigger- १ (प्रथम कळ) अनुषंगाने पंचनामे करण्यात येणार आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com




# ‘ईडी’ चे यवतमाळ, वणीत सर्च ऑपरेशन

## बाबाजी दाते महिला बँकेतील २४२ कोटींचा घोटाळा, थकबाकीदार रडारवर

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**यवतमाळ** : शहरातील बहुचर्चित बाबाजी दाते महिला सहकारी बँकेतील सुमारे २४२ कोटी रुपयांच्या घोटाळा व थकबाकी प्रकरणी गुरुवारी १ ऑक्टोंबर रोजी सकाळपासून सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) कडक कारवाईचा बडगा उभारला आहे. यवतमाळ, वणी येथील एकूण ९ बड्या थकबाकीदारांसह संचालकांच्या निवासस्थानी ‘ईडी’च्या वेगवेगळ्या पथकांनी एकाच वेळी छापे टाकले. या अचानक झालेल्या कारवाईमुळे यवतमाळ, वणी परिसरातील सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

अवसायनात निघालेल्या बाबाजी दाते महिला सहकारी बँकेच्या शेकडो सर्वसामान्य सभासद, ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये गेल्या अनेक वर्षांपासून अडकलेले आहे. बँकेतून मोठे कर्ज घेऊन ते थकीत ठेवणाऱ्या व वारंवार सूचना देऊनही कर्जाचा भरणा न करणाऱ्या बड्या थकबाकीदारांवर अखेर 'ईडी'ची करडी नजर पडली आहे. गुरुवारी पहाटेपासूनच विविध वाहनांतून आलेल्या अधिकाऱ्यांच्या पथकांनी यवतमाळ व वणी येथील निश्चित केलेल्या ठिकाणी शोधमोहीम सुरू केली.



### कागदपत्रांची कसून तपासणी

» दिवसभर चाललेल्या या छापासत्रात बँकेतील कर्जवाटप, कर्जखात्यांची सद्यस्थिती, तारण ठेवलेल्या मालमत्तांचे वास्तव मूल्यांकन, थकीत रकमेचे व्यवहार तसेच संशयास्पद आर्थिक देवाणघेवाणीशी संबंधित सर्व कागदपत्रांची बारकाईने तपासणी करण्यात आली. काही प्रमुख संशयित संचालक आणि मोठ्या व्यावसायिकांच्या घरांतून आणि कार्यालयातून महत्त्वाचे दस्तावेज व डिजिटल पुरावे पडताळून पाहण्यात आल्याची चर्चा आहे.



### कारवाईकडे लक्ष

» बँक बुडाल्यामुळे हवालदिल झालेल्या हजारो ठेवीदारांचे लक्ष आता या कारवाईकडे लागले असून, 'ईडी'च्या चौकशीतून या कोट्यवधींच्या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार कोण, ठेवीदारांचे पैसे परत कधी मिळणार, याचे उत्तर समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### थकबाकीदारांचे धाबे दणाणले

» दिवसभर चाललेल्या या मोठ्या कारवाईदरम्यान कोणती कागदपत्रे, रोकड किंवा इतर डिजिटल साहित्य जप्त करण्यात आले, याबाबत 'ईडी'च्या अधिकाऱ्यांकडून अद्याप अधिकृत वृत्त देण्यात आलेले नाही. मात्र, या धडक कारवाईमुळे कर्ज बुडवून बिनधास्त फिरणाऱ्या बड्या थकबाकीदारांचे चांगलेच धाबे दणाणले असून बचावासाठी त्यांची मोठी पळापळ सुरू झाली आहे.

# ‘स्वच्छता हीच सेवा’ अभियानाची उत्साहात सांगता

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त प्रभात फेरी, वृक्षारोपण



प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**आलेगाव** : ‘स्वच्छता हीच सेवा अभियानांतर्गत येथील शाळेत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध स्वच्छता, पर्यावरण व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानाची सांगता आज महात्मा गांधी जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. अभियानाच्या कालावधीत स्वच्छता जनजागृती, कचरा वर्गीकरण, CTU चे सुशोभीकरण, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती जनजागृती, कंपोस्ट निर्मिती, Waste to Wealth, शून्य कचरा उपक्रम, स्वच्छ पर्यटन, सफाई मित्रांविषयी कृतज्ञता, वृक्षारोपण तसेच विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. महात्मा गांधी जयंतीनिमित्त अभियानाच्या समारोप प्रसंगी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृतीपर घोषणा देत नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. अभियानात उत्कृष्ट सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करून त्यांचा गौरव करण्यात आला. या संपूर्ण अभियानास पातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री. प्रवीण जी. डाबेराव, विस्तार अधिकारी तसेच केंद्रप्रमुख आलेगाव श्री. निवास जी. चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शाळेचे प्राचार्य महावीर जैन यांच्या नेतृत्वात हे अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले.

# जानेवारी ते ऑगस्ट दरम्यान कुत्रा चावण्याच्या 13 हजार 671 घटना

## शासकीय रुग्णालयात अँटी रेबीज औषध उपलब्ध

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : रेबीज हा संक्रमित प्राण्याच्या चावण्यामुळे किंवा ओरखड्यामुळे होणारा गंभीर व जीवघेणा विषाणूजन्य आजार आहे. रेबीजपासून प्रतिबंध करण्यासाठी अकोला जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये अँटी-रेबीज लस उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी प्राणी चावल्यानंतर वेळ न दवडता तातडीने आरोग्य संस्थेत उपचार घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. अकोला जिल्ह्यात जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत एकूण १५ हजार ५५० प्राणी चावल्याच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक १३ हजार ६७१ घटना कुत्रा चावल्याच्या आहेत. त्यापाठोपाठ १ हजार ३२६ मांजर चावण्याच्या, ८८ माकड चावण्याच्या आणि ४६५ इतर प्राण्यांमुळे झालेल्या चावण्याच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. या कालावधीत रेबीजमुळे मृत्यूची नोंद झालेली नाही एकूण जानेवारी ते ऑगस्ट 2026 प्राणी चावल्याच्या घटना घडल्या. कुत्रा-१३,६७१, मांजर-१,३२६, माकड-८८ व इतर-४६५ मिळून एकूण १५,५५०. रेबीजचा विषाणू संक्रमित प्राण्याच्या लाळेतून जखमेत प्रवेश करू शकतो. त्यामुळे कुत्रा, मांजर, माकड किंवा अन्य सस्तन प्राण्याने चावा घेतल्यास किंवा ओरखडा काढल्यास जखम साबण आणि वाहत्या पाण्याने किमान १५ मिनिटे व्यवस्थित धुवावी. त्यानंतर विलंब न करता जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. नागरिकांनी पाळीव कुत्रे व मांजरांना वेळेवर रेबीज प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. तसेच कोणत्याही प्राण्याने चावा घेतल्यास घरगुती उपचार किंवा अंधश्रद्धेवर अवलंबून न राहता तातडीने शासकीय आरोग्य संस्थेत उपचार घ्यावेत, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत मनपात आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीराचे आयोजन

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला:** "सेवा संकल्प अभियान" अंतर्गत 1 ऑक्टोंबर रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये मनपा प्रशासनाव्दारा अकोला महानगरपालिका अधिनस्त असलेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराच्या माध्यमातून मनपा अधिनस्त असलेल्या अधिकारी आणि कर्मचा-यांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली.

तसेच यावेळी मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने, अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, सहा. आयुक्त गणेश शहाणे, सहा.आयुक्त राजेश सरप यांचेसह अधिकारी, कर्मचारी यांनी रक्तदान केले. सदर शिबीराचे आयोजन मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनात तसेच मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.अविनाश सोनोने यांच्या



सहकार्याने संपन्न झाले असून या शिबीरामध्ये मनपाचे डॉ.अनुप चौधरी, डॉ.विजय चव्हाण, डॉ.नितीन गायकवाड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.योगनंदाश मानकर, डॉ.अवंती किलाकर, रोहित तेलगोटे, पंकज वानखडे, मयुरी गायकवाड, अमर काटोले, अनिल जाधव, मनपाचे डॉ.योगेश प्रभे, डॉ.हर्षल चोपडे, डॉ.पुजा इंगळे, डॉ.राजीव पोपटाणी, डॉ.अमित डाबेराव, डॉ.अहबार रजा, सविता गवारगुरू, पंकज गायकवाड, प्रतिक गाडगे, राहूल उपरवट, अंकुश धुड, सुरेखा राठोड, वैशाली जाधव, हर्षल मेश्राम, सुचिता अढाऊ, अक्षय महाले, अर्चना झ्याटे, दीपिका सिरसाट आदींनी आपली वैद्यकीय सेवा दिली आहे.

# अकोल्यातील 329 शाळा ‘मॅडम’विना; बाल संरक्षणावर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : जिल्ह्यातील तब्बल ३२९ शाळांमध्ये एकही महिला शिक्षिका नसल्याची गंभीर बाब महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण आयोगाच्या आढावा बैठकीत समोर आली. बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आयोगाने याची गंभीर दखल घेत संबंधित यंत्रणांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

महिला शिक्षिका नसलेल्या शाळांमध्ये दर शनिवारी महिला शिक्षिका विद्यार्थिनींच्या संपर्कात जाणार आहेत. विद्यार्थिनींच्या अडचणी, सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न तसेच आवश्यक मार्गदर्शनासाठी ही व्यवस्था करण्यात येणार आहे.

याशिवाय, संबंधित शाळांमध्ये नियमित महिला शिक्षिका उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. त्यामुळे शनिवारी होणाऱ्या व्यवस्थेबरोबरच या ३२९ शाळांना कायमस्वरूपी महिला शिक्षिका कधी मिळणार, हा प्रश्न आता महत्त्वाचा ठरला आहे.

विशेष म्हणजे, महिला व बालविकास भवनातील अधिकाऱ्यांकडे जिल्ह्यात नेमक्या किती शाळांमध्ये महिला शिक्षिका नाहीत, याची अचूक आकडेवारी उपलब्ध नसल्याची बाब समोर येत आहे. बाल संरक्षणासारख्या संवेदनशील विषयातच आकडेवारीबाबत स्पष्टता नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

बालकांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश बाल संरक्षण आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांनी दिले आहेत. आता आयोगाच्या दखलीनंतर ३२९ शाळांमध्ये नियमित महिला शिक्षिकांची नियुक्ती प्रत्यक्षात कधी होते, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्यावर नळाचे पाणी सोडणाऱ्यांवर केव्हा होईल कारवाई?

## वाहने धुणाऱ्यांवर सुद्धा लावला पाहिजे चाप

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला:** राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर झाल्यानंतर तसेच नळांना बारा दिवसानंतर पाणी सोडले जात असल्या वरही पाण्याचे मूल्य न जानणाऱ्या लोकांवर महापालिकेने कारवाई करण्याची वेळ येऊन ठेपली आहे नळाला पाणीआले म्हणून मनसोक्त वापरायचे आणि उरलेले पाणी रस्त्यावर सोडायचे किंवा वाहनांवर ओतायचे असे प्रकार ज्या दिवशी नळांना पाणी येते त्या दिवशी हमखास पहावयास मिळतात. तसेच शहरात अनेक नळांना तोट्या नसल्याने नळ बंद होइस्तोवर पाणी नाली मध्ये वाहून जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे पाण्याची नासाडी करणाऱ्यांवर महापालिकेने कारवाई करावी अशी मागणी शहरातील सुज्ञ नागरिक करीत आहेत.



### घंटा गाड्यांमार्फत शहरात मनपाने करावी जनजागृती

» पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यापूर्वी मनपाने नागरिकांना ताकीद देण्यासाठी शहरात घरोघरी कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्यांद्वारे पाणी बचतीचे आवाहन तसेच प्रचार व प्रसिद्धी करणे आवश्यक झाले आहे त्यानंतर पाण्याची नासाडी होताना आढळल्यास संबंधित नागरिकांवर कारवाई करावी तसेच शहरातील अवैध नळ जोडण्यावरही महापालिकेने लक्ष देणे सध्या गरजेचे झाले आहे

### महान धरणात केवळ 22 टक्के पाणीसाठा

» शहराची लाईफ लाईन मानल्या जाणाऱ्या महान धरणात केवळ 22 टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे त्यातही उन्हाळ्या सारखे ऊन तपत असल्याने पाण्याचे बाष्पीभवन सुद्धा जलद गतीने होत आहे आगामी उन्हाळ्यात पाण्याचा वापर वाढणार असल्याने आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे शहरात बारा दिवसानंतर नळाला पाणी येते त्या दिवशी गरजेपुरते पाणी भरून घेतल्यानंतर नळाच्या तोट्या बंद ठेवणे आणि पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे आवश्यक आहे याकरिता महापालिकेने शहरात पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांवर तसेच अवैध नळ जोडूनी आढळल्यास संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करावा अशी मागणी होत आहे

# आरआरसीच्या पाठपुराव्यानंतर कुटुंब नियोजनाची आकडेवारी समोर; अकोला जिल्हा पिछाडीवर

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कुटुंब कल्याण कार्यक्रमातील शस्त्रक्रियांच्या उद्दिष्टपूर्तीबाबत आर आर सी न्यूजने प्रश्न उपस्थित केल्यानंतर आरोग्य विभागाने संबंधित आकडेवारी उपलब्ध करून दिली आहे. या आकडेवारीतून कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांच्या उद्दिष्टपूर्तीत अकोला जिल्हा मोठ्या प्रमाणात पिछाडीवर असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. २०२५-२६ या वर्षात पुरुष व महिला मिळून ७ हजार ६५२ कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

त्यापैकी प्रत्यक्षात केवळ २ हजार ६३१ शस्त्रक्रिया झाल्या. म्हणजेच निर्धारित उद्दिष्टाच्या अवघ्या ३४.३८ टक्के उद्दिष्टाची पूर्तता झाली. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या वर्षाची आकडेवारीही समाधानकारक नसल्याचे दिसून येते. २०२४-२५ मध्ये ५ हजार ९१० शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

त्यापैकी केवळ २ हजार १५६ शस्त्रक्रिया झाल्या. त्यामुळे त्या वर्षीही उद्दिष्टपूर्ती ३६.४८ टक्क्यांवरच थांबली. सलग दोन वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकली असता कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियांच्या उद्दिष्टपूर्तीची स्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट होते. २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन्ही वर्षांत शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ५० टक्क्यांपर्यंतही पोहोचलेले नाही. २०२५-२६ मध्ये पुरुष शस्त्रक्रियांचे ९४३ उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात केवळ ६२ शस्त्रक्रिया झाल्या. म्हणजेच उद्दिष्टपूर्ती अवघ्या ६.५८ टक्क्यांवर राहिली. मागील वर्षी ६८० उद्दिष्टांपैकी केवळ ७६ पुरुष शस्त्रक्रिया झाल्या होत्या. महिला शस्त्रक्रियांचे प्रमाण तुलनेने अधिक असले तरी त्यातही मोठी तफावत आहे. २०२५-२६ मध्ये ६ हजार ७०८ महिला शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट असताना २ हजार ३६९ शस्त्रक्रिया झाल्या. म्हणजेच केवळ सुमारे ३५.३ टक्के उद्दिष्टपूर्ती झाली. शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट ५० टक्क्यांपर्यंतही का पोहोचत नाही? आणि उद्दिष्टपूर्तीसाठी आरोग्य विभागाने आतापर्यंत कोणत्या ठोस उपाययोजना केल्या? या प्रश्नांची उत्तरे आता आरोग्य विभागाला द्यावी लागणार आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे झालेल्या पीक नुकसानीची जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज शेतात जाऊन पाहणी केली. येवता, येळवण आणि कानशिवणी परिसरातील कपाशी, सोयाबीन, तूर आणि संत्रा पिकांच्या नुकसानीची पाहणी करताना शेतांचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

दुष्काळामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालंय. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी येवता, येळवण आणि कानशिवणी परिसरातील शेतांची पाहणी केली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांनी नुकसानीची माहिती जाणून घेतली. येवता येथे शे. रशीद शे. इस्माईल आणि दीपक भोयर यांच्या शेतातील सोयाबीन



नुकसानीची पाहणी करण्यात आली. तर येळवण येथे गुलाबराव ठाकरे यांच्या शेतातील सोयाबीन आणि तूर पिकाची पाहणी करण्यात आली. कानशिवणी येथे यशवंत खोब्रागडे यांच्या कापूस पिकाची, तर सुनीता मेश्राम यांच्या सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी करण्यात आली.

शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळण्यासाठी पंचनामे सविस्तर आणि काळजीपूर्वक करा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. प्रत्येक नुकसानीची नोंद अचूकपणे करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. दरम्यान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मनरेगाच्या माध्यमातून शेतरस्ते, विहिरी आणि इतर कामे मोठ्या प्रमाणात सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. येळवण येथे फळबाग लागवड योजना, मनरेगा फळबाग लागवड, एचडीपीई पाईप, स्प्रिंकलर संच आणि पोकराअंतर्गत सामूहिक शेततळ्यांच्या कामांचीही पाहणी करण्यात आली. तर कानशिवणी येथे ई-पीक पाहणीअंतर्गत प्रत्यक्ष शेतावर जाऊन पिकांची पडताळणी करण्यात आली.

# शहर वाहतूक शाखेची विना परवाना, विना नंबर आणि ओव्हरलोड हायवा टिपर्सवर धडक कारवाई

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : ०१ ऑक्टोबर रोजी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात आणि महामार्गावर वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चाप लावण्यासाठी वाहतूक शाखेने आज एक मोठी धडक मोहीम राबवली. या मोहिमेअंतर्गत विना परवाना,1 विना नंबर प्लेट आणि क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणाऱ्या हायवा आणि टिपर्सवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून शहरामध्ये हायवा आणि जड टिपर्स अत्यंत बेदरकारपणे आणि वेगाने धावत असल्याच्या तक्रारी जिल्हा व शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील साहेब यांना नागरिकांकडून वारंवार प्राप्त होत होत्या. तसेच, अनेक वाहनांकडे वैध वाहतूक परवाना नसणे, पाठीमागे किंवा पुढे नंबर प्लेट नसणे किंवा नंबर अस्पष्ट असणे, आणि क्षमतेपेक्षा जास्त वाळू, मुरूम यांसारखे बांधकाम साहित्य ओव्हरलोड करून वाहतूक केली जात असल्याचे वाहतूक शाखेच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर, पोलीस अधीक्षकांच्या विशेष मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या पथकाने आज पहाटेपासूनच शहरातील प्रमुख चौक आणि महामार्गावरील महत्त्वाच्या प्रवेशद्वारांवर कडक नाकाबंदी लावली होती. या नाकाबंदीदरम्यान प्रत्येक जड वाहनाची कसून तपासणी करण्यात आली. क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक करणाऱ्या टिपर्सना ताब्यात घेऊन त्यांच्यावर मोटार वाहन कायद्यानुसार अवजड दंड आकारण्यात आला. या धडक मोहिमेमध्ये एकूण १९ हायवा व टिप्पर वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आले असून, त्यांच्याकडून एकूण ४२,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. अनेक विना परवाना धावणारी वाहने वाहतूक पोलिसांनी जप्त करून पोलीस ठाण्यात जमा केली आहेत.

# आरटीओला 10 बॉडीकॅमेरे; आता तपासणीचा प्रत्येक क्षण रेकॉर्ड होणार

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**अकोला** : वाहन तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी अकोला प्रादेशिक परिवहन विभागाला 10 बॉडी-वॉर्न कॅमेरे प्राप्त झाले आहेत. तपासणीदरम्यान अधिकारी कॅमेऱ्यांचा वापर करणार असल्याने कारवाईचे चित्रीकरण उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मात्र, कॅमेरे आले असले तरी त्यांच्या वापरातून प्रत्यक्षात किती पारदर्शकता येणार, हा प्रश्न आता महत्त्वाचा ठरत आहे.

वाहन तपासणीच्या वेळी अधिकारी आणि वाहनचालक यांच्यात होणारा संवाद, वाहनातील त्रुटी, कागदपत्रांची तपासणी तसेच दंडात्मक कारवाई याचे रेकॉर्डिंग होणार असल्यास तक्रारींच्या वेळी वस्तुस्थिती तपासणे अधिक सोपे होऊ शकते. मात्र, यासाठी प्रत्येक तपासणीचे रेकॉर्डिंग अनिवार्य आहे का, रेकॉर्डिंग किती काळ जतन केले जाणार आणि नागरिकांना संबंधित फुटेज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था काय आहे, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. बॉडी कॅमेऱ्यांच्या वापरामुळे तपासणी प्रक्रियेवर देखरेख वाढणार असली तरी कॅमेरा प्रत्यक्ष तपासणीच्या वेळी सुरू होता की नाही, याची नोंद कशी ठेवली जाणार, तांत्रिक कारणामुळे रेकॉर्डिंग झाले नाही तर त्याची जबाबदारी कोणाची, तसेच रेकॉर्डिंगमध्ये फेरफार होऊ नये यासाठी कोणती यंत्रणा आहे, हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. विशेषतः एखाद्या वाहनचालकाने RTOच्या कारवाईबाबत तक्रार केली तर ‘कॅमेऱ्यात काय रेकॉर्ड झाले?’ याचे उत्तर महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे बॉडीकॅमेरे केवळ तपासणी पथकाच्या वापरासाठी आहेत की नागरिकांच्या तक्रारींच्या निवारणासाठीही त्यांचा उपयोग होणार आहे, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

### दंडवसुलीही पारदर्शक हवी

वाहन तपासणीदरम्यान दंड आकारला जात असल्यास संबंधित वाहनचालकाला कोणत्या नियमाखाली कारवाई करण्यात आली, दंडाची रक्कम किती आणि त्याची अधिकृत पावती याची माहिती मिळणे अपेक्षित आहे. बॉडीकॅमेऱ्यांच्या वापरासोबतच कारवाईची कारणे आणि दंडवसुलीची प्रक्रिया डिजिटल पद्धतीने नोंदवली गेल्यास तपासणी व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास वाढू शकतो.

# नुकसानभरपाईसाठी टाकळी वतपाळ येथील शेतकऱ्यांनी जिगाव प्रकल्पाचे काम थांबविले!

## प्रशासनाची धावपळ; अधिकाऱ्यांशी चर्चा निष्फळ

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**खामगाव:** जिगाव प्रकल्पाची मातीची भिंत फुटून ३१ जुलै रोजी आलेल्या पुराच्या पाण्यामुळे शेतीपंप, स्टार्टर, बॉक्स, केबल, पाइप तसेच अन्य शेती साहित्याचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईच्या मागणीसाठी शेगाव येथील जिगाव प्रकल्प कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे, मात्र या उपोषणाची दखल न घेतल्याने संतप्त शेतकऱ्यांनी १ ऑक्टोबर रोजी जिगाव प्रकल्पाचे थांबविले. काम नुकसानभरपाईबाबत प्रशासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी ही भूमिका घेतली.



टाकळी, वतपाळ आणि खेडगाव परिसरातील शेतांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या नुकसानाचे पंचनामे करून तातडीने मदत व नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

यासंदर्भात १२ ऑगस्ट रोजी नांदुरा तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी तहसीलदार तसेच जिगाव प्रकल्पाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीपंप व अन्य साहित्याचे तलाठी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमार्फत पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे समितीचे म्हणणे आहे. मात्र, पंचनामे होऊनही अद्याप अपेक्षित मदत किंवा नुकसानभरपाई मिळाली नसल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला. या मागणीसाठी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली २८ सप्टेंबरपासून जिगाव प्रकल्प कार्यालयासमोर बेदमुदत उपोषण सुरू आहे.

### ठोस तोडगा नाही!

उपोषणाची दखल घेतली जात नसल्याने अखेर १ ऑक्टोबर रोजी संतप्त शेतकऱ्यांनी प्रकल्पाचे काम बंद पाडले. घटनेची माहिती मिळताच पोलिस, महावितरण, तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी प्रकल्पस्थळी दाखल झाले. त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला; मात्र नुकसानभरपाईबाबत ठोस तोडगा निघाला नाही.

# मलकापुरात गणेशोत्सवानंतर 'त्या' स्थगित मोहिमेला पुन्हा वेग

## बुलढाणा-मुक्ताईनगर रोडवर प्रशासनाचा जेसीबी फिरला

प्रतिनिधी २ ऑक्टोबर



**मलकापूर:** मागील ९ सप्टेंबर रोजी तात्पुरती स्थगित करण्यात आलेली अतिक्रमण हटाव मोहीम १ ऑक्टोबरपासून पुन्हा पूर्ण ताकदीने सुरू करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत बुलढाणा रोडसह मुक्ताईनगर रोडवरील रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंचे ४० फुटांच्या आतील सर्व अतिक्रमणे जमिनीदोस्त केली. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे संबंधित मार्गावरील नियमबाह्य दुकानदारांची व अतिक्रमणधारकांची मोठी धांदल उडाल्याचे पाहायला मिळाले.

सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा अर्बन बी वोटिं,पोलीस प्रशासन व स्थानिक यंत्रणांनी राज्य महामार्ग क्रमांक ७५३ ए वरील 'बोदवड चौफुली ते भारत काटा' या मुख्य मार्गावरील अतिक्रमण हटवण्याचा निर्णय घेतला होता. यासंदर्भात वृत्तपत्रांतील जाहीर आवाहनासह अतिक्रमणधारकांना आधीच नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. नोटिसा मिळाल्यानंतर काही नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य करत स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतली; मात्र अनेक ठिकाणी सूचना देऊनही अतिक्रमणे जैसे थेच होती.

यापूर्वी ९ सप्टेंबर रोजी प्रशासनाने बोधवड चौफुलीपासून एसटी बस स्थानकापर्यंत जेसीबीच्या साहाय्याने मोठी कारवाई केली होती. परंतु गणेशोत्सव व इतर स्थानिक कारणांमुळे ही मोहीम काही काळासाठी थांबवण्यात आली होती.

### भोंग्याद्वारे दवंडी अन् थेट धडक कारवाई

बुधवार , ३० सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने बुलढाणा रोड आणि मुक्ताईनगर रोडवर भोंगा फिरवून (दवंडी देऊन) १ ऑक्टोबरपासून पुन्हा अतिक्रमण हटवले जाईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली होती. या सूचनेनंतर काहींनी तातडीने आपली अतिक्रमणे हटवली, तर आज सकाळीच पोलीस बंदोबस्तात जेसीबीसह पथक दाखल झाले. रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूंना ४० फुटांच्या नियमात येणाऱ्या सर्व टपऱ्या, शेड व बांधकामांवर प्रशासनाने थेट कारवाई केली.

प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली , या अतिक्रमण मोहिमे मुळे खूप लोकांचे व्यवसाय व संसार उघड्यावर आलेत.

# निराधार योजनेसाठी जाचक अटी रद्द करुन तत्काळ मानधन द्यावे!

## राज्याचे मुख्यमंत्री यांना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश चौकसे यांचे निवेदन

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**खामगाव:** संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी वयोवृद्ध परितक्त्या (घटस्फोटीत) महिला योजनेसाठी शाळा सोडल्याचा दाखला व जन्म दाखल्याची सक्ती या जाचक अटी रद्द करुन निराधारांना तात्काळ मानधन देण्यात यावे या मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी पाठविले आहे.

सदर निवेदनात नमूद आहे की, महाराष्ट्र शासनाकडून एका बाजुला कोट्यावधी रुपयांची उधळपट्टी जाहीरातीत केल्या जात आहे. कोट्यावधी रुपयांचे पुतळे उभारण्यात येत आहे. आमदार खासदारांना दरमहा लाखो रुपये पगार दिल्या जात आहे त्यांना कोट्यावधी रुपये पेंशन देण्यात येत आहे.



संकटकालीन दुसऱ्या देशांना कोट्यावधी रुपयांची मदत केली जाते तर दुसऱ्या बाजूला राज्यातील अत्यंत गरिब,वृद्ध, घटस्फोटीत महिला, विधवा महिला व वयोवृद्ध अपंग निराधारांना १५०० रुपयांच्या मदतीसाठी शासकीय दारात तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे ही गोरगरीब आणि असहाय्य निराधारांची एक प्रकारची त्यांच्या परिस्थितीची थट्टा होय. शासनाने या योजनेसाठी जन्म दाखला व शाळा सोडल्याचा दाखला यांची सक्ती करुन निराधारांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले आहे. स्वातंत्र्यपूर्व किंवा स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळात जन्माला आलेल्या, निरक्षर असलेल्या व अशिक्षित वृद्धांनी, महिलांनी ६५ ते ७० व्या वर्षी शाळेचा दाखला कोठून आणायचा? ही अट म्हणजे सनदशीर मार्गाने निराधारांना योजेनतून बेदखल करण्याचे षडयंत्र वाटत आहे. आज आजारपणात औषधासाठी वृद्ध नागरीकांना तहसील कार्यालयात चपला घासाव्या लागतात ही अतिशय संतापजनक व लाजीरवाणी बाब असून लोकशाहीची थट्टा आहे. त्यामुळे शासन व प्रशासनाने काळा कायदा सदृश्य अटी रद्द करा. जन्म दाखला व शाळा सोडल्याचा दाखल्याची जाचक व अमानुष अट तात्काळ रद्द करण्यात यावी.

आधार व मतदार कार्ड हेच अंतिम प्रमाण मानन्यात यावे.ज्या आधार व मतदार ओळखपत्रावर आमदार, खासदार व सरकार निवडले जाते त्याच आधार कार्डला व मतदान कार्डाला वयाचा अधिकृत आणि अंतिम पुरावा म्हणून मान्यता देण्यात यावी.शासकीय वैद्यकीय दाखला/ स्वघोषणापत्र लागू करण्यात यावे.अतिवृद्धांसाठी स्थानिक शासकीय ग्रामीण व शहरी रुग्णालयाचा वैद्यकीय दाखला किंवा स्वघोषणापत्र ग्राह्य धरुन सात दिवसात मंजुरी द्यावी.

तहसील स्तरावर विशेष शिबीरे भरवादलालांची साखळी मोडून काढण्यासाठी थेट गावात व तहसील स्तरावर शिबिरे लावून जागीच निराधारांचे अर्ज मंजूर करावेत.जियो टॅगिंग ची अट रद्द करण्यात यावी. (पटवारी यांची प्रत्यक्ष पाहणी रद्द करावी.) या मागण्याचा समावेश करण्यात आला आहे.या मागण्याची तात्काळ दखल घेण्यात यावी अन्यथा नाईलाजास्तव राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र स्वरुपात आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी निवेदनातून दिला आहे.सदर निवेदनाच्या प्रती ना.एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री,ना. श्रीमती सुनेत्राताई पवार उपमुख्यमंत्री,ना. चंद्रशेखर बावनकुळे महसुल मंत्री,विजय वडेट्टीवार माजी विरोधी पक्षनेता, उध्दव ठाकरे माजी मुख्यमंत्री, ना.मकरंद जाधव पाटील पालकमंत्री,जिल्हाधिकारी बुलढाणा, उपविभागीय अधिकारी खामगांव,तहसीलदार खामगांव, डॉ.बबनराव तायवाडे राष्ट्रीय अध्यक्ष ओबीसी महासंघ यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# अंगणवाडी केंद्रात 'सेवा संकल्प व पोषण महिना'

## माता-भगिनींना संतुलित आहाराबाबत मार्गदर्शन

**जळगाव जामोद :** तालुक्यातील झाडेगाव येथील अंगणवाडी केंद्रात 'सेवा संकल्प व पोषण महिना' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला पर्यवेक्षिका प्राजक्ता किनगे यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपळगाव बिट परिसरातील अंगणवाडी सेविका, मदतनीस तसेच माता-भगिनी यावेळी उपस्थित होत्या. यावेळी अंगणवाडी केंद्रातील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. विविध पौष्टिक पदार्थ आणि कडधान्यांची आकर्षक मांडणी करून त्यांच्या आहारातील महत्त्व उपस्थित माता-भगिनींना समजावून सांगण्यात आले. स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध होणाऱ्या पौष्टिक पदार्थांचा दैनंदिन आहारात समावेश करण्याच्या पद्धतींबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

पर्यवेक्षिका किनगे यांनी बालकांच्या सर्वांगीण वाढीसाठी संतुलित व पोषणयुक्त आहार, तसेच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व विशद केले. बालकांच्या आरोग्याकडे पालकांनी नियमित लक्ष देण्याचे आवाहन त्यांनी केले. महिलांच्या बौद्धिक व शारीरिक विकासाला चालना देण्यासाठी विविध खेळ आणि उपक्रम घेण्यात आले.

# तहसील कार्यालय लोणार येथे 'सेवा संकल्प' अभियानांतर्गत 252 लाभार्थ्यांना सेवांचा मिळाला लाभ

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**बुलढाणा :** नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ सुलभतेने आणि कालमर्यादित उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय, लोणार येथे 'सेवा संकल्प अभियान' व 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता अभियान' उत्साहात पार पडले. यावेळी 252 लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी प्रशांत सानप होते. तहसीलदार भूषण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. अभियानांतर्गत पोटखराब क्षेत्राचे लागवडीखालील क्षेत्रात रूपांतर करण्यासंदर्भातील आदेश, कालमर्यादित निकाली काढलेल्या विविध प्रकरणांचे अंतिम आदेश, तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मंजुरी आदेश व विविध पत्रव्यवहार, शपथपत्रांचे वाटप करण्यात आले. नकल विभागामार्फत नकल, आयुष्यमान भारत कार्ड तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत ऑनलाइन शिधापत्रिकांचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले.

यावेळी नागरिकांना 12 पोटखराब क्षेत्र वहिती आदेश, 13 आधार कार्ड, 21 शिधापत्रिका, 17 रहिवास व अधिवास दाखले, 25 आयुष्यमान कार्ड, 43 संजय गांधी निराधार योजना मंजुरी आदेश, 37 नकल, 19 ऑनलाइन 7/12 उतारे, 36 उत्पन्नाचे दाखले आणि 29 विविध दाखले, अशा एकूण 252 लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, लोणार यांच्या सहकार्याने उपस्थित नागरिकांसाठी मोफत सार्वजनिक आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले.

या माध्यमातून नागरिकांना आरोग्य तपासणीसह आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांना त्याचा लाभ घेता आला.

# जिल्ह्यात जूनपर्यंत 1.71 लाख टन चाऱ्याची संभाव्य तूट

## जानेवारीनंतर रब्बी उत्पादनावर भिस्त

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**बुलढाणा:** जिल्ह्यातील पशुधनासाठी ऑक्टोबर ते जून या नऊ महिन्यांत आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या तुलनेत १ लाख ७० हजार ८५५ मेट्रिक टनांची संभाव्य तूट आहे. सर्व स्रोतांतील अपेक्षित उपलब्धता विचारात घेऊनही गरजेच्या १८.४ टक्के चारा कमी पडणार आहे.

प्रशासनाच्या अंदाजानुसार शिल्लक आणि खरीपातून मिळणारा चारा जानेवारीअखेरपर्यंत पुरेल. त्यानंतरची गरज भागविण्यासाठी रब्बीतील वैरण उत्पादन वाढविणे आवश्यक ठरणार आहे. जिल्ह्यात १० लाख ८५ हजार ६४५ पशुधन असून, त्यासाठी दरमहा १ लाख २ हजार ९८० टन चारा लागतो. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीची गरज ९ लाख २६ हजार ८२० टन आहे. त्याच्या तुलनेत सर्व स्रोतांमधून ७ लाख ५५ हजार ९६५ टन चारा अपेक्षित आहे.



### पशुधन आणि चाऱ्याची गरज

» लहान जनावरे १,४५,१२९; मोठी जनावरे ४,५०,५४७; मेंढ्या १,२५,२८०; शेळ्या ३,६४,६८९. दैनंदिन गरज सुमारे ३,४३३ टन. मासिक गरजेच्या आधारे बारा महिन्यांसाठी १२,३५,७६० टन चारा आवश्यक. तालुकानिहाय मासिक गरजेत खामगाव १६,१६२ टनासह आघाडीवर आहे.

रब्बीतील संभाव्य उत्पादनही धोक्यात राहण्याची शक्यता विचारात घेता प्रसंगी ही तूट आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. चारा उपलब्धता वाढविण्यासाठी व्हीएमडीडीपी योजना आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मोफत वैरण बियाणे उपलब्ध केले जाणार आहे. पाच हजार रुपयांच्या मर्यादित बियाणे देण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली.

### जूनपर्यंतची गरज असल्याने तूट वाढली!

» शिल्लक व खरीपातून अनुमानित चारा ४,६१,९६६ टन आहे. केवळ या उपलब्धतेवर जूनपर्यंतची उणीव ४,६४,८५४ टनापर्यंत जाते; परंतू नैसर्गिक स्रोत आणि वैरण विकासातील अपेक्षित उत्पादनासह एकूण उपलब्धता गृहीत धरल्यावर तूट १,७०,८५५ टन आहे.

# दोन तलवारींसह तरुणाला अटक; मलकापुरात कारवाई

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**मलकापूर :** शहरातील पोस्ट ऑफिससमोर बेकायदेशीररीत्या दोन तलवारी बाळगणाऱ्या तरुणाला मलकापूर शहर पोलिसांनी १ ऑक्टोबर रोजी दुपारी ताब्यात घेतले. मिर्जा जीशान बेग मिर्जा कलीम बेग (३६, रा. पिल्लू तकिया पारपेट, मलकापूर) याच्याकडून दोन स्टीलच्या तलवारी जप्त करण्यात आल्या. माहितीच्या आधारे गस्त सरू असताना ही कारवाई

करण्यात आली. जप्त केलेल्या तलवारी लाल आणि निळ्या रंगाच्या म्यानमध्ये ठेवलेल्या होत्या. प्रत्येकी सुमारे ८० सेंटीमीटर या लांबीच्या तलवारींची अंदाजे किंमत ४ हजार रुपये आहे. जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियमाच्या कलम ३७ (१) (३) अन्वये लागू केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याचेही पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल आसिफ गफ्फार शेख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केमिकल अंगावर उडाल्यानंतर तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

## 'बेंझो केमिकल'मधील घटना; मृत्यूचे कारण अस्पष्ट

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**मलकापूर:** दसरखेड एमआयडीसीतील बेंझो केमिकलमध्ये करणाऱ्या ३२ वर्षीय तरुणाच्या अंगावर व्हॉल्वमधून केमिकल उडाल्यानंतर प्रकृती बिघडली. त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान गुरुवारी (१ ऑक्टोबर) दुपारी त्याचा मृत्यू झाला. ललित महादेव वाघ (वय ३२, रा. चाळीसबिघा परिसर, मलकापूर) असे मृताचे नाव आहे.

ललित वाघ हे बेंझो केमिकलच्या युनिट क्रमांक १ मध्ये कार्यरत होते. गुरुवारी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास व्हॉल्वमधून केमिकल त्यांच्या अंगावर उडाले. त्यानंतर त्यांनी आंघोळ केली. काही वेळाने डोके जड पडू लागल्याने त्यांनी वरिष्ठांना याबाबत माहिती दिली. कंपनीच्या वाहनाने त्यांना मलकापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुरुवातीला ते डॉक्टरांशी बोलत होते. मात्र, काही वेळाने त्यांची प्रकृती गंभीर झाली. डॉक्टरांनी उपचाराचे प्रयत्न केले; परंतु त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला.

### फॉरेन्सिक पथकाची पाहणी

» घटनेची माहिती मिळताच मलकापूर शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनेची पाहणी व तपासासाठी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. केमिकल नेमके कोणते होते, त्याचा संपर्क किती प्रमाणात झाला आणि मृत्यूचे वैद्यकीय कारण काय, याबाबतची माहिती तपासानंतर स्पष्ट होणार आहे. पुढील तपास सुरू आहे.

# मत्स्यव्यवसाय अंतर्गत सहकारी संस्थांकडून तलाव ठेक्याने घेण्याबाबत प्रस्ताव आमंत्रित

**बुलडाणा:** कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग बुलडाणा कार्यालयाकडून दि.26 सप्टेंबर 2023 रोजीचे पत्रान्वये धानोरी. क्र.(10.22 हेक्टर), कनका बु. (4.055 हेक्टर), घारोड क्र.1 20.13 हेक्टर, भुमराळा पाझर तलाव 4.21 हेक्टर हे तलाव मत्स्यव्यवसाय विभागाकडे मासेमारी ठेक्याने देण्यासाठी नव्याने हस्तांतरित झाले असून, हे तलाव सन 2023-24 ते 2027-28 या पाच वर्षांसाठी मासेमारीसाठी ठेक्याने देण्यात येणार आहेत.

# नांदुरा रेल्वे स्थानकावर विविध एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळावेत

## एम. एच. ५६ प्रवासी संघटनेच्या जनजागृती अभियानाला सुरुवात; २ ऑक्टोंबरपासून स्वाक्षरी मोहीम

प्रतिनिधी २ ऑक्टोबर

**खामगाव:** रेल्वे स्थानकावर विविध एक्स्प्रेस गाड्यांना थांबे मिळावेत, या मागणीसाठी एमएच ५६ प्रवासी संघटनेच्या वतीने गेल्या वर्षभरापासून शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू आहे. प्रवाशांच्या या मागणीला व्यापक लोकसमर्थन मिळावे आणि रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधले जावे, यासाठी आता संघटनेने आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून जनजागृती अभियान आणि स्वाक्षरी मोहीम हाती घेतली आहे.

नांदुरा हे बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाचे - रेल्वे स्थानक असून परिसरातील अनेक गावांतील नागरिक, विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार, शेतकरी तसेच विविध कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी रेल्वे वाहतूक महत्त्वाची आहे. मात्र, अनेक महत्त्वाच्या एक्स्प्रेस गाड्यांना नांदुरा स्थानकावर थांबा नसल्यामुळे प्रवाशांना इतर

स्थानकांवर जाऊन रेल्वे पकडावी लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अतिरिक्त खर्च होत असल्याचे प्रवासी संघटनेचे म्हणणे आहे. या प्रश्नाकडे रेल्वे प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी एमएच ५६ प्रवासी संघटनेने मागील वर्षभरात विविध लोकप्रतिनिधी, रेल्वे अधिकारी आणि प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या आहेत. यावेळी संघटनेच्या वतीने सुमारे ३० ते ३२ निवेदने तसेच ई-मेलच्या माध्यमातून नांदुरा रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या समस्या आणि विविध एक्स्प्रेस गाड्यांना थांबे देण्याची मागणी सातत्याने मांडण्यात आली आहे. मागणीवर अद्याप अपेक्षित निर्णय झालेला नसल्याने संघटनेने आंदोलनाचा पुढील टप्पा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. म. गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबरपासून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार असून, नांदुरा व परिसरातील नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपल्या स्वाक्षरीद्वारे प्रवाशांच्या मागणीला पाठिंबा द्यावा, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135